॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव २५ ( ) हिंदी ही राष्ट्रभाषा असली तरी हिंदी भाषिक प्रांतातील व्यक्तींकडून शुध्द हिंदी भाषेचा होत असलेला आग्रह हा संवादात मोठा अडथळा आहे तेव्हा संवाद होण्यासाठी समोरच्या व्यक्तीला समजेल अशा भाषेतच संवाद केला जावा अशी अपेक्षा महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष डॉ.शीतलाप्रसाद दुबे यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास व संशोधन केंद्रातील हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित `हिंदी भाषा और संप्रेषण` या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.दुबे बोलत होते. कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील उद्‌घाटक म्हणून उपस्थित होते. भाषा प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु.पगारे अध्यक्षस्थानी होते.

डॉ.दुबे म्हणाले की, आजच्या काळात केवळ संवादाने प्रश्न सुटणार नाहीत. ऐकायला कुणी तयार नाही कारण त्यांना समजेल अशा भाषेत बोलले जात नाही. दुसरीकडे आपल्या देशातील वाचनाची समृध्द परंपरा संपुष्टात येत चालली आहे. अशावेळी भाषा आणि साहित्याचे चिंतन करणाऱ्या धुरिणांनी केवळ विद्वत्तेची भूमिका न घेता लोकांमध्ये जावून प्रयत्न करण्याची गरज आहे. हिंदी भाषिक प्रांतातील लोकांनी शुध्दतेचा दुराग्रह सोडावा. इतर मातृभाषेत शिक्षण घेणाऱ्या व्यक्तींनी फुटकळ हिंदी भाषेत बोलण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा सन्मान ठेवला जावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

उद्‌घाटकीय भाषणात कुलगुरू प्रा.पाटील म्हणाले की, मानवी जीवनात भाषेला महत्व आहे. संवादामुळे माणूस हा इतर कोणत्याही प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ ठरतो. सुख,दुःख व आपल्या भाव-भावना व्यक्त करण्यासाठी भाषा हे प्रभावी माध्यम आहे. हिंदी ही देशातील संपर्काची प्रभावी भाषा आहे असे ते म्हणाले.

वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील हिंदी विभागप्रमुख प्रा.के.के.सिंह यांनी आपल्या बीजभाषणात हिंदी भाषा ही सहजपणे संवाद साधता येणारी भाषा आहे. पारिभाषीक शब्दावली तयार करताना बोली भाषेतील शब्दांचा विचार केला जावा असे सांगुन पर्यायी शब्द असंख्य असल्यामुळे अनेकदा अडचणी येतात. हिंदी भाषेने इतर अनेक भाषेतील शब्द सामावून घेतले आहेत आणि संवादासाठी ते खुप आवश्यक आहेत त्यामुळे ही भाषा अधिक समृध्द झाली आहे. जागतिकीकरणामुळे प्रादेशिक भाषांवर मोठे संकट आले आहे. अशावेळी संवादाच्या क्षमता ओळखून भाषा वृध्दींगत करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्रा.म.सु.पगारे यांनी भाषा संवादातील विविधता स्पष्ट केली.

प्रारंभी चर्चासत्राचे संयोजक डॉ.सुनील कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.प्रिती सोनी व प्रा.अश्फाक शिकलगार यांनी केले. डॉ.आशुतोष पाटील यांनी आभार मानले. त्यानंतरच्या सत्रात प्रा.अंबादास जोशी यांनी हिंदी भाषीक स्वरूप या विषयावर व डॉ.सुनील डहाळे यांनी भाषीक संवादांचे सिध्दांत या विषयावर मांडणी केली. ज्येष्ठ पत्रकार राहुल रनाळकर हे चर्चक म्हणून उपस्थित होते.

दुपारच्या सत्रात प्रा.एच.एन.वाघेला (भावनगर गुजरात), प्रा.सदानंद भोसले (पुणे) यांनी मार्गदर्शन केले. चर्चक म्हणून आनंदसिंह,आकाशवाणी, मुंबई हे उपस्थित होते. सत्राचे अध्यक्ष सुधीर ओखदे होते. सायंकाळी प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर यांच्या अध्यक्षतेखाली समारोप झाला. यावेळी महाराष्ट्र हिंदी परिषदेचे अध्यक्ष डॉ.मधु खराटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

---

जा.क्र. कबचौउमवि/१६/हस्तदेय /२०१९ दि. २५ मार्च, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत //--
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

☎ : (९१) ०२५७- (२२५७२४८, २४९, २५३) वेबसाईट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७- (२२५८४०३, ४०६) ई-मेल : pro@nmu.ac.in